लोकसेवा हक्क कायदा
Right to Public Service Act
आपली सेवा आमचे कर्तव्य

# लातूर शहर महानगरपालिका,लातूर

## " अग्निशमन व आणीबाणी सेवा मुख्यालय "

[महाराष्ट्र आग व जीवसंरक्षक कायदा 2006(6 डिसेंबर 2007) महा. आग व जीवसंरक्षक अधिनियम 2009]

जाक्र.लाशमनपाला/अग्नि-नाप्रप / 60/2026-27 दिनांक:- 25.05.2026

## ना-हरकत प्रमाणपत्र

## (नुतनीकरण)

प्रती,
प्राचार्य,
कै.बब्रुवान विठ्ठलराव काळे,
आयुर्वेदीक वैदयकीय महाविदयालय,
व रूग्णालय, गांधी मैदान,लातूर.

भाडेकरू

संदर्भ:(1) ना-हरकत (नुतनीकरण) प्रमाणपत्र मिळविण्याकरिता आपला प्राप्त अर्ज दि.09.04.2026
(2) **श्री.साई फायर फायटींग सेल्स&सर्व्हिसेस,लातूर** लायसन्स क्र.MFS/LA/RF-316/RD-296.दि.31.05.2024 या प्राधिकृत अभिकर्तादवारा प्राप्त फायर सेफ्टी ऑडिट रिपोर्ट दि.08.04.2026

### नुतनीकरण ना-हरकत प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **प्राचार्य, कै.बब्रुवान विठ्ठलराव काळे, आयुर्वेदीक वैदयकीय महाविदयालय व रूग्णालय, गांधी मैदान, लातूर.** संदर्भ 1 चे विनंती अर्जानुसार व संदर्भ 2 चे शासन प्राधिकृत अभिकर्ता / संस्थेद्वारे अग्नि सुरक्षा ऑडिट करून **हॉस्पीटल** या व्यवसायासाठी अग्निशमन विभाग म.न.पा.लातूर यांचे ना-हरकत प्रमाणपत्राची मागणी केली आहे.तसेच **दिनांक 14.05.2026** ला तांत्रिक तपासणी अग्निशमन अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांनी केली. त्यानुसार खालील नियम व अटी शर्तींच्या आधीन राहून आपणास नाहरकत नुतनीकरण प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते.

1) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवसंरक्षक अधिनियम 2006-09 व सुधारीत 2023 तसेच NBC 2016 चे भाग चार मधील टेबल नं.7 च्या तरतुदीनुसार अनुपालन करावे लागेल व NBC-2016 मधील नियमांची पूर्तता करण्यात यावी तसेच महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय व लातूर शहर महानगरपालिकेने वेळोवेळी सुधारणा केलेले नियम व त्यामधील बदल आपल्यावर बंधनकारक राहतील.
2) इमारतीचे Fire Safety Audit नुसार संपूर्ण अग्नि सुरक्षा व्यवस्था करावी लागेल. आवश्यक त्या ठिकाणी धुम्रपान निषेध फलक लावावे लागेल व महत्वाचे दूरध्वनी क्रमांक उदा. पोलिस नियंत्रण कक्ष, अग्निशमन दल, ॲब्युलन्स इ.चा फलक दर्शनिय ठिकाणी लावावे लागेल.
3) अग्नि सुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण, मा. संचालक अग्निशमन सेवा, मुंबई यांनी नोंदणीकृत केलेले अनुज्ञाप्तीधारक अभिकरणांकडून जानेवारी व जुलै असे वर्षातून दोन वेळा अर्जदाराने स्वतःहून करून घेणे बंधनकारक राहील.
4) आपल्या सर्व कर्मचारी वर्गास अग्निरोधक उपकरणाची वेळोवेळी माहिती देण्यात यावी व सराव घेण्यात यावा.
5) आग प्रतिबंधक उपाय योजना नेहमीसाठी कार्यान्वित रहावी याची दक्षता घ्यावी. सर्व विदयुत उपकरणे वेळोवेळी तांत्रिक तंत्रज्ञाकडून तपासून घ्यावेत.

कृ.मा.प.....

6) आग प्रतिबंधक उपाययोजनाबाबत लावलेल्या अग्निशमन उपकरणाची पाहणी अग्निशमन दल मार्फत केव्हाही करण्यात येईल त्याकरिता आपली हरकत राहणार नाही. अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र सोबत आवश्यक असल्यास इतर विभागाचे आवश्यक ते परवाने आपल्यास्तरावर प्राप्त करून घ्यावेत.

7) नाहरकत प्रमाणपत्राची वैधता मर्यादित कालावधीसाठी राहील.

8) वरील अधिनियमाप्रमाणे व्यवस्थे अभावी आगीची कोणतीही घटना घडल्यास व त्यामध्ये जिवित व वित्त हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी व्यवस्थापनाची ( मालक / भोगवटदार ) यांची राहील.

9) दरवर्षी नियमानुसार नुतनीकरण शुल्क भरून अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे अर्जदारास बंधनकारक राहील.

10) सदर अधिनियमामधील कोणत्याही तरतुदीन्वये काढलेल्या आदेशाची, नोटीसची किंवा निर्देशाचे उल्लंघन केल्यास किंवा अनुपालन करण्यात कसूर केल्यास संबंधित प्रकरणी अधिनियम मधील कलम 7, 8, 36 नुसार कार्यवाही करण्यात येईल.

11) अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र हे केवळ इमारतीच्या अग्निशमन यंत्रणेकरिता मर्यादित राहील याचा इतर इमारत बांधकाम संदर्भात कुठलाही संबंध राहणार नाही.

12) वरील बाबींची पूर्तता न झाल्यास आपले नाहरकत प्रमाणपत्र रद्द समजण्यात येईल व याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

पावती क्र.**0057/15013 दि.22.05.20256**
उपरोक्त प्रमाणपत्र हे **दि.25.05.2026 ते 09.04.2027** पर्यंत वैध राहील.

**टीप:-**1) अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्राचे नुतनीकरण दरवर्षी करणे अनिवार्य आहे.
2) शासन नियमानुसार जानेवारी आणि जुलै महिन्यात **फॉर्म 'बी'** सादर करणे अनिवार्य आहे.
3) खोटे/बनावट कागदपत्रे सादर करून नाहरकत दाखला प्राप्त केल्यास सदरचा नाहरकत दाखला रद्दबातल ठरला जाईल.

25/05

प्रभारी अग्निशमन अधिकारी
अग्निशमन व आणीबाणी सेवा विभाग
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

मुख्य अग्निशमन अधिकारी
अग्निशमन मुख्यालय म.न.पा.